महाराष्ट्र शासन

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय, जालना

प्रशासकीय इमारत, सर्वे नं.488, जालना

दूरध्वनी क्रमांक : 02482-223132 फॅक्स क्रमांक : 02482-226477

जा.क्र.2020/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावी दि.17.06.2020

आपत्ती प्राधान्य

वाचा –

१. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५.
२. साथ रोग नियंत्रण अधिनियम, १८९७.
३. या कार्यालयाचे समक्रमांकित फौजदारी दंडप्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) अन्वये मनाई आदेश दि.२१.०५.२०२०
४. या कार्यालयाचे समक्रमांकित फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) अन्वये संचारबंदी आदेश दि.२८.०५.२०२०
५. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र.डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीएमयु-१ दि.३१.०५.२०२० रोजीचे निर्बधांचे सुलभता आणि लॉकडाऊन टप्पेनिहाय उघडणे (Mission Begin Again)
६. या कार्यालयाचे समक्रमांकित आदेश दि.३१.०५.२०२०.
७. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग आदेश क्र.डीएमयु-२०२०/सीआर-९२/डीएमयु-१ दि.०४.०६.२०२० रोजीचे निर्बधांचे सुलभता आणि लॉकडाऊन टप्पेनिहाय उघडणे (Mission Begin Again) बाबतचे सूधारित मार्गदर्शक सूचना.
८. या कार्यालयाचे समक्रमांकित फौजदारी दंडप्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) अन्वये मनाई आदेश दि.०४.०६.२०२०

विषय– फौजदारी दंडप्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(१)(३) अन्वये जालना जिल्हयात मनाई आदेश लागू करणे बाबत.

**सूधारित आदेश –**

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणुचा (कोव्हिड – १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम, १८९७ दि.१३.०३.२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड – १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी, कोविड – १९ चा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र.५ अन्वये शासनाने संपूर्ण राज्यात लॉकडाऊन दि.३०.०६.२०२० रोजीच्या मध्यरात्री पर्यंत वाढविण्यात आलेला आहे. तसेच लॉकडाऊन मधील निर्बधांचीसुलभता आणि लॉकडाऊन टप्पेनिहाय उघडणे (Mission Begin Again) बाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र.६ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता चे कलम १४४(१)(३) मधील तरतूदी नुसार दि.०१.०६.२०२० रोजीपासून ते दि.३०.०६.२०२० रोजीच्या रात्री १२.०० वाजेपर्यंत जालना जिल्हयातील संपूर्ण ग्रामीण, शहरी क्षेत्रात उक्त कालावधीत रात्री ०९.०० ते सकाळी ०५.०० वाजेपर्यंत संचारबंदी आदेश लागू करण्यात आले आहे.

ज्याअर्थी ,संदर्भ क्र.७ अन्वये शासनाने त्यांचे दि.३१.०५.२०२० रोजीच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सूधारित निर्देश निर्गमित केले आहेत.

त्याअर्थी, मी रवींद्र बिनवडे, जिल्हादंडाधिकारी जालना संदर्भ क्र.७ अन्वये शासनाने खालील प्रमाणे लॉकडाऊन मधील निर्बंधाची सुलभता आणि लॉकडाऊन टप्पेनिहाय उघडणे (Mission Begin Again) बाबत निर्गमित केलेल्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने या कार्यालयांचे संदर्भ क्र.८ वरील आदेशातील परिच्छेद क्र.७ मध्ये – " जिल्हयातील सर्व खते, बियाणे / औषधे / कृषी यंत्रे / अवजारे / ट्रक्टर उपकरणे व त्यांचे दुरुस्ती स्पेअर पार्टस् / स्प्रे पंप / सिंचन साहित्य पाईप / ठिबक / तुषार सिंचन / शेततळे अस्तरीकरण कागद इत्यादी संबंधी दुकाने व दुरुस्ती सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत सुरु राहतील." असे नमूद करण्यात आले आहे. त्यात अंशतः सूधारणा करुन जालना

Scanned by CamScanner

जिल्ह्यातील सर्व दुकाने (मेडिकल / हॉस्पिटल वगळून) यांचे उघडण्याचे व बंद करणेच्या वेळेमध्ये एकसुत्रता आणण्यासाठी जिल्ह्यातील सर्व दुकाने उघडण्याची व बंद करण्याची वेळ अनुक्रमे सकाळी ०९.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत राहिल.

कुठल्याही व्यक्तींकडून या आदेशातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास कोणत्याही व्यक्ती, संस्था अथवा समूह आपत्ती यांचे विरुध्द व्यवस्थापन अधिनियम, २००५ चे कलम ५१ तसेच भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम १८८ नुसार शिक्षेस पात्र असलेला अपराध केला असे समजण्यात येईल व पुढिल कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

DISTRICT MAGISTRATE JALNA

(रविंद्र बिनवडे भा.प्र.से.)
**जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**

**प्रत – (आवश्यक त्या कार्यवाहीस्तव)**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना
२. पोलीस अधिक्षक, जालना
३. सर्व उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, जिल्हा जालना
४. सर्व तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार जिल्हा जालना
५. सर्व विभाग प्रमुख, जिल्हा जालना
६. जिल्हा माहिती अधिकारी, जालना

**प्रतिलिपी –**

१. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा.संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

Scanned by CamScanner